# ILS LAW COLLEGE, PUNE – 411004

# TOP CLASS EDUCATION SCHEME FOR SC STUDENTS 2022-2023

विधी या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थांना पुढील पदवी शिक्षणासाठी भारत सरकारची **Top Class Education Scheme for SC students 2022-23** यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नवीन मंजूरीचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. नवीन मंजुरीसाठी State Common Entrance Test (CET) कडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येत आहे. नवीन मंजुरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांना State Common Entrance Test (CET) कडून गुणवत्ता यादी (Merit List) मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज online भरले जातील.

**किमान पात्रता व अटी -**

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, विधी एलएल.बी. (५ वर्ष) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत व विधी एलएल.बी. (३ वर्ष) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ३ वर्षापर्यंत देय राहील.

**या योजनेसाठी ४ विद्यार्थ्यांची गुणवत्तेवर आधारित निवड करण्यात येईल. यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी दि. २६ नोव्हेंबर २०२२ पर्यंत महाविद्यालयाकडे लेखी अर्ज सादर करावे. सदर अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्या.**

१. फी रिसीट व CET Confirmation letter.

२. CET Score card

३. उत्पन्नाचा वैध दाखला (वैधता ३१ मार्च २०२३ पर्यंत असणे आवश्यक आहे.)

४. अधिवास प्रमाणपत्र

५. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

ILS LAW COLLEGE ★PUNE-4★

(डॉ. दीपा पातुरकर)

(प्रभारी प्राचार्य)